# महासागर
# नागपूर वृत्तसागर

■ शुक्रवार, दि. ११, एप्रिल २०२५ ■


## २ ड्रग्ज विक्रेता गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

गुन्हे शाखेचे एनडीपीएस पथक आणि युनिट 5 च्या पथकाने वेगवेगळ्या घटनांमध्ये अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली. पहिली कारवाई एनडीपीएस पथकाकडून जरीपटका ठाण्यांतर्गत करण्यात आली. रोशन भीमराव डोंगरे (27) रा. समतानगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

गुरूवारी सकाळी एनडीपीएस विभागाचे पथक जरीपटका ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान नारी रोडवरील समतानगर परिसरात एक तरुण अंमली पदाथार्ची विक्री करण्यासाठी आला असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसरात सापळा रचला. मोटारसायकलने संशयास्पदरित्या जात असलेल्या रोशनला थांबविले. झडतीमध्ये त्याच्याजवळ 20 ग्रॅम एमडी मिळाले. पोलिसांनी त्याच्याकडून ड्रग्ज, मोबाईल आणि दुचाकी वाहनासह एकूण 1 लाख 65 हजार रुपयांचा माल जप्त केला. त्याच्याविरुद्ध जरीपटका ठाण्यात एनडीपीएस अ‍ॅक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. चौकशीत रोशनने, तो हसनबाग परिसरात राहणाऱ्या उबेर अंसारीकडून माल घेत असल्याची माहिती दिली.

दुसरी कारवाई गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने वाठोडाच्या सिम्बॉसिस कॉलेजजवळ केली. एक युवक कॉलेजच्या आसपास तरुणांना अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी मीराबाग कॉलनीत सापळा रचून परिसरातच राहणाऱ्या तनवीर अली शौकत अली (32) याला पकडले.

## वर्षभरात वीजचोरीचे ४ हजार १९६ धक्कादायक प्रकार उघडकीस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

नागपूर जिल्ह्यात महावितरणने केलेल्या धडक कारवाईत गेल्या आर्थिक वर्षात (१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५) वीजचोरीचे तब्बल ४ हजार १९६ गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत. या चोरीमुळे महावितरणला सुमारे ७ कोटी १९ लाख ५४ हजार रुपयांच्या ३८ लाख ३९ हजार ७२८ युनिट विजेचे नुकसान झाले आहे. याव्यतिरिक्त, प्रत्यक्ष गरजेव्यतिरिक्त इतर कारणांसाठी किंवा अप्रत्यक्षपणे वीज वापरणाऱ्या 302 ग्राहकांवरही कठोर कारवाई करण्यात आली आहे. तर 171 वीज चोरट्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले.

महावितरणने वीजचोरी विरोधात अधिक आक्रमक भूमिका घेतलेल्या या कारवाईमध्ये नागपूर जिल्ह्यातील ४ हजार १९६ वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांना चोरीच्या बिलासह दंड ठोठावण्यात आला आहे.

यापैकी ३ हजार ८७८ ग्राहकांकडून तडजोडीपोटी १ कोटी २३ लाख ८९ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. आकडेवारीनुसार, वीजचोरी करणाऱ्यांमध्ये तारांवर आकडा टाकून वीज चोरणाऱ्या २ हजार ३४५ ग्राहकांचा समावेश आहे.



तर, १ हजार ८५१ ग्राहकांनी थेट मीटरमध्ये छेडछाड करणे, मीटर बंद पाडणे, रिमोट कंट्रोलने मीटर दूरून बंद करणे, मीटरमध्ये छिद्र पाडून रोध निर्माण करणे किंवा मीटरची गती कमी करणे यांसारख्या गैरमार्गांचा अवलंब करून वीज चोरली आहे. यासोबतच, अधिक धक्कादायक बाब म्हणजे, प्रत्यक्ष वापराव्यतिरिक्त इतर कारणांसाठी किंवा अप्रत्यक्ष वीज वापरणाऱ्या ३०२ ग्राहकांनी ३ लाख १३२ युनिट विजेचा अनधिकृत वापर केला, ज्यासाठी त्यांना ८३ लाख ४४ हजार रुपयांचे देयक आकारण्यात आले आहे.

वीजचोरी रोखण्यासाठी महावितरण सातत्याने कठोर पाऊले उचलत आहे. नागपूर परिमंडलात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेदरम्यान एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या आर्थिक वर्षाच्या काळात उघडकीस आलेल्या वीजचोरीच्या प्रकरणांमध्ये चोरांनी अवलंबलेल्या क्लृप्त्या पाहून अधिकारीही चक्रावून गेले. यात मीटरमध्ये अत्यंत चलाखीने फेरबदल करणे, ते पूर्णपणे बंद पाडणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत रिमोटने मीटर बंद करणे, तसेच मीटरच्या मागील बाजूस छिद्र पाडून त्यात अडथळा निर्माण करून मीटरची गती कमी करणे किंवा बंद करणे यांसारख्या नवनवीन पद्धतींचा वापर उघडकीस आला आहे.

आता महावितरणने वीज चोरांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला आहे. या अंतर्गत, सदोष मीटर तसेच सरासरी वीज बिल असलेल्या सर्वच ग्राहकांच्या मीटरची कसून तपासणी सुरू करण्यात आली आहे. यासोबतच, थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित केलेले आणि सवलत देऊनही अभय योजनेत सहभागी न झालेल्या ग्राहकांविरोधात कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा सर्व ग्राहकांच्या प्रत्यक्ष तपासणीला सुरुवात झाली आहे.

वीजचोरीच्या अनधिकृत विद्युतभारामुळे वीजवाहिन्या आणि रोहित्रांवर क्षमतेपेक्षा जास्त ताण येतो. यामुळे रोहित्र निकामी होणे, शॉर्ट सर्किट होऊन वीजपुरवठा खंडित होणे यांसारख्या समस्या उद्भवतात. याचा नाहक त्रास नियमितपणे वीज बिल भरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांना सहन करावा लागतो आणि महावितरणलाही मोठा आर्थिक फटका बसतो.

## ट्रांसपोर्टरचा ट्रक पेटवला

■ महासागर प्रतिनिधी, , नागपूर, दि. १० :

वैयक्तिक वैमनस्यातून एका गुंडाने साथीदारांसोबत मिळून ट्रान्सपोर्टरचा मालाने भरलेला ट्रक पेटवला. ही धक्कादायक घटना वाडी पोलिस ठाण्यांतर्गत गुरूवारी पहाटेच्या सुमारास घडली. या प्रकरणी वाडी पोलिसांनी विजय वाघमारे रा. दवलामेटी यांच्या तक्रारीवरून आरोपी प्रशिक धोके व त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. आरोपी सध्या फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय यांचा ट्रांसपोर्टचा व्यवसाय आहे. आरोपी प्रशिक हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्यांच्याच परिसरात राहतो. विजय आणि प्रशिक यांच्यात जुना वाद आहे. बुधवारी विजय यांनी त्यांच्या ट्रकमधून रामटेक आणि बुटीबोरी येथील दोन कंपन्यांसाठी गुजरातहून काही माल आणला होता. रात्रीला त्यांनी माल असलेला ट्रक घरासमोरच पार्क केला आणि रात्रीला ट्रकमध्येच झोपले होते. गुरूवारी पहाटेच्या सुमारास त्यांची झोप उघडली असता ट्रकच्या मागील भागातून धूर निघताना दिसला. ते ट्रक खाली उतरले असता आरोपी प्रशिक आणि त्याचे साथीदार पळून जाताना दिसले. विजय यांनी आरडा-ओरड करीत शेजाऱ्यांना मदतीसाठी बोलावले. तात्काळ पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. मात्र तोपर्यंत बराचसा माल जळून खाक झाला होता. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. वाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासून आरोपींची ओळख पटविण्यात येत आहे. या घटनेने स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने आरोपींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

### पूर्वी झाला होता वाद

प्रशिक धोके व विजय यांच्यात याआधीही वाद झाला होता, मात्र दोघेही एकाच परिसरात राहत असल्याने तो वाद स्थानिक पातळीवर मिटवण्यात आला होता. मात्र आता आगीत मालाचे मोठे नुकसान झाल्यामुळे विजय यांनी आरोपींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई आणि नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

## एकदा विकलेला प्लॉट दुसऱ्याला विकून डॉक्टरची फसवणूक

### वर्धा पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १० :

एकदा विकलेला प्लॉट दुसऱ्या ग्राहकाला परत विकून प्लॉटधारकाने नागपूर येथील एका डॉक्टरची लाखो रुपयांनी फसवणूक केली. ही बाब लक्षात येताच त्यांनी वर्धा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दिली असून दोनदा दोघांना एकच प्लॉट विकणाऱ्या वर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

निलडोह न प अंतर्गत गजानन नगर, हिंगणा रोड निवासी डॉ शीतल उमरे यांनी वर्धा जिल्ह्यातील मौजा सालोड (हिरापूर) ता - जिल्हा वर्धा येथील खसरा नं ३८०/२मधील अभिन्यासातील भूखंड क्र २०,आराजी १४९.४०चौरस मिटर याची रजिस्टर विक्रीपत्र करून खरेदी केली होती. दि २९/१२/२०१६ ला दुय्यय निबंधक कार्यालयात डॉ ज्योत्स्ना अशोक कांबळे व डॉ अशोक निळकंठ कांबळे यांच्या तर्फे आम मुख्तियार धारक मनोज वासुदेव निमसडकर व जयंत रामकृष्ण तुपे यांनी रजिस्ट्री करून दिली. याची रजिस्ट्री त्यांच्याकडे आहे. मध्यंतरी त्यांचे प्लॉटवर जाणे कमी झाले होते. याचाच फायदा घेत यातील आममुखत्यार जयंत रामकृष्ण तुपे रा. पर्यावरण नगर ,वर्धा रोड नागपूर यांनी एकट्याच्या सहीने हाच प्लॉट ३०/०१/२०२१ ला राजेश अमृतलाल वसानी यांना संगन्मताने परस्पर विकला. डॉ शितल उमरे हे ज्यावेळी त्या प्लॉटवर गेले तेव्हा वसानी यांनी हा प्लॉट त्यांनासुद्धा विकल्याचे सांगितले. आता त्या प्लॉटची किंमत तिप्पट वाढली आहे. आर्थिक लोभामुळे जयंत तुपे यांनी फसवणूक केल्याचे लक्षात येताच त्यांनी याबाबत वर्धा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून दोषींवर योग्य कारवाई करून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी हिंगणा येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

## स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी महाराष्ट्र दिनाचा निषेध करणार विदर्भ राज्य आंदोलन समितीचा एल्गार



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

महाराष्ट्र सरकार शेतकरी आत्महत्या रोखू शकत नाही म्हणून विदर्भाचे स्वतंत्र राज्य तात्काळ हवे म्हणून विदर्भ राज्य आंदोलन समिती विदर्भातील सर्व शेतकरी व इतर शोषित व उपेक्षित घटकांच्या पाठीशी पूर्ण ताकदनी उभी राहणार आहे. याचेच प्रतीक म्हणून एक मे महाराष्ट्र दिनाच्या निषेध करून काळा किती लावणार असल्याची माहिती विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष वामन चटक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या कोअर कमिटी सदस्य जिल्हाध्यक्ष, जिल्हा समन्वयक, शहराध्यक्ष व पदाधिकारी यांची बैठक आज विदर्भ केदार भवन गिरी पेठ नागपूर येथे डॉक्टर श्रीनिवास यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. एक मे महाराष्ट्र दिन जिल्हा जिल्ह्यात धरणे आंदोलन केले जाणार असून महाराष्ट्र दिनाच्या निषेध म्हणून काळ्या फिती लावून आंदोलन केले जाणार आहे.

पश्चिम विदर्भात विदर्भाच्या सर्व समस्यांचे प्रशिक्षण व्हावे व विदर्भाची लढाई सामान्य माणसांपर्यंत, शोषित घटकांपर्यंत व अपेक्षित वर्गांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने पश्चिम विदर्भाचा मेळावा 25 मे 2025 रोजी दुपारी बारा वाजता पासून अमरावती येथे आयोजित केला आहे.

यात शेतकरी आत्महत्या विदर्भाचा अनुशेष, सोशियो इकॉनोमिक प्रश्न असणारा नक्षलवाद, प्रदूषण कुपोषणामुळे होणारे गर्भार माता व बालमृत्यू याची कारणे यावर चर्चा घडवून विदर्भावचे स्वतंत्र राज्य हेच या प्रश्नाचे कायम उत्तर आहे याबाबत जनमानस आंदोलनासाठी तयार होईल व महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात अपयशी ठरले असून विदर्भाचे स्वतंत्र राज्य मिळविणे हेच विदर्भ राज्य आंदोलन समितीचे एकमेव उद्दिष्ट ठरले आहे.

## हिट अ‍ॅन्ड रन मध्ये तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

अज्ञात वाहनाच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून एका दुचाकीस्वार तरुणाला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताची ही घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. हितेश योगराज सारंगपुरे (28) रा. श्रावणनगर असे मृताचे नाव आहे.

गत 5 एप्रिलच्या रात्री हितेश एमएच-49/एएफ-1701 क्रमांकाच्या दुचाकीने चांदमारी मार्गाने जात होता. पाण्याच्या टाकीजवळ पांढऱ्या रंगाच्या कारच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून हितेशच्या दुचाकीला मागून जबर धडक दिली आणि पळून गेला. हितेश दुचाकीसह खाली पडून गंभीर जखमी झाला. स्थानिक नागरिक त्याच्या मदतीला धावले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. वाठोडा पोलिस घटनास्थळी पोहोचले.

हितेशला उपचारार्थ खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले. त्याची प्रकृती चिंताजनक होती. बुधवारी उपचारादरम्यान हितेशचा मृत्यू झाला. पोलिसांनी त्याचे वडील योगराज यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासून आरोपी चालकाचा शोध घेण्यात येत आहे.

## घरकुल बांधणीच्या कामात वाळू तुटवड्यामुळे अडथळा



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

सर्वसाधारणपणे उन्हाळ्यात घरबांधणीच्या कामाला गती येते. सरकारी योजनेतील घरकुलांची कामेही याच काळात होतात. मात्र यंदा बांधकामासाठी वाळूच उपलब्ध होत नाही. सरकारने दोन दिवसापूर्वी नवे वाळू धोरण जाहीर केले. पण जुने डेपो बंद आहेत. सरकारने कंत्राटदारांचे पैसे न दिल्याने ही वेळ आली आहे. नागपूर हा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जिल्हा आहे. तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाळू तस्करीवर आळा घालण्यासाठी सरकारी डेपोतून वाळू विक्री सुरू केली होती. डेपोसाठी वाळूचे उत्खनन कंत्राटदारामार्फत केले जात होते. नागपूर जिल्ह्यात १३ डेपो सुरू करण्यात आले होते. या डेपोधारक कंत्राटदाराचं ७ कोटी ८०लाख सरकारकडे थकले होते. ते देण्यासाठी निधी द्यावा, असा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. पण शासनाकडून फक्त २ कोटी १५ लाख रपुयेच देण्यात आले. यातून नोव्हेंबर २०२४ पर्यंतचे देयके चुकते क रण्यात आले. उर्वरित देयके थकित आहे. शासनाकडे पैसे नसल्याने ही अवस्था उद्धभवली आहे.

लाडक्या बहिणींना पैसे देताना आवश्यक योजनांसाठीही निधी शिल्लक नसल्याने त्याचा फटका घरबांधणीला बसला आहे. त्यासाठी वाळू उपलब्ध नाही, चढ्या दराने ती खरेदी करावी लागत आहे.

नवीन वाळू धोरणाची दोन दिवसापूर्वीच सरकारने घोषणा केली त्यानुसार पुन्हा वाळू घाटांचा लिलाव केला जणार आहे. कंत्राटदार वाळूचा अति उपसा करतात, त्यामुळेच त्यांच्याकडून होणाऱ्या उत्खननावर बंदी आणली गेली होती. दोनच दिवसांपूर्वी भंडारा जिल्ह्यातील दोन अधिकाऱ्याना वाळू तस्करीबाबत निलंबित करण्यात आले होते. या जिल्ह्यात परवानगी नसताना वाळू उत्खनन केले जात होते हे तपासात निष्पन्न झाले होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बार्टीतर्फे संविधान महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134व्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार, संवैधानिक मूल्यांचे महत्त्व, सामाजिक न्याय आणि वाचनसंस्कृती यांचा जागर करण्यासाठी बार्टीतर्फे 'भारतीय संविधान अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या साप्ताहात बार्टीतर्फे सिध्देश्वर, रहाटेनगर टोली येथे स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी शिबीर, सिध्देश्वर झोपडपट्टीतील आदिवासी मुलींच्या क्रिकेट संघास क्रिकेट साहित्याचे वितरण. यासह पिरॅमिड आणि विलास अकॅडमीतील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, जिल्हा विधी व न्याय प्राधिकरण यांच्यातर्फे आवश्यक शासकीय कागदपत्रांची माहिती, संवैधानिक मुलभूत आधिकार व कर्तव्याची माहिती देण्यात येणार आहे. सोबतच बार्टीतर्फे राबविण्यात येत असलेल्या संशोधन, प्रशिक्षण, कौशल्य विकास योजनांची माहितीचा प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यात येणार आहे.

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 13 एप्रिलला राहाटे नगर टोली येथे तथागत वाचनालयात 'आठ तास वाचन दिन' साजरा करण्यात येणार आहे. वाचनालयात सकाळी 9 ते 5 या वेळेत विद्यार्थ्यांसह नागरिकांना वाचनासाठी प्रेरित करण्यात येणार आहे. 14 एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त करिअर कॅम्पस अकॅडमी येथे बाबासाहेबांना अभिवादन करुन संविधान महोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे. यानिमित्त बार्टीतर्फे जेईई, नीटच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना करिअर आणि मुलभूत संवैधानिक मुल्यांची जाणीव याबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती बार्टी प्रादेशिक कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

## डॉ. राजेश नाईक यांचे ९१ वे रक्तदान




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

मानव सेवा हिच खरी ईश्वर सेवा आहे, या उक्तीला अनुसरून जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने अतीविषेशोपचार रुग्णालय (सुपर स्पेसिलिटी हॉस्पिटल), नागपूरच्या रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सागरजी गवई, डॉ. अजयजी डोंगरे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ रुपाली कावळे, स्टाफ नर्स प्रफुल्ल सोनटक्के, अंकित रामटेके यांच्यासह इत्यादी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या विशेषज्ञ समूह समितीचे सदस्य, महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदचे सदस्य, डागा स्मृती शासकिय स्त्री रुग्णालय, गांधीबाग, नागपूरच्या नियामक समिती आणि कार्यकारी समितीमधिल मा. जिल्हाधिकारी महोदयांचे प्रतिनिधी आणि सदस्य, नागपूर शहर केंद्रीय पोलिस शांतता समितीचे सदस्य आणि आखिल भारतिय मराठी नाट्य परीषद, नागपूर शाखेचे कार्यकारीणी सदस्य आणि श्री मयुरेश जिवनविकास परिवार संस्थाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजेश नाईक यांनी अती विषेशोपचार ( सुपर स्पेसिलिटी हॉस्पिटल ) रुग्णालय, तुकडोजी पुतळा चौक, मानेवाडा रोड, नागपूरच्या रक्तपेढीमध्ये जाऊन आपल्या "91" व्या रक्तदानाची फेरी पूर्ण केली. या निमित्ताने श्री मयुरेश जिवनविकास परिवार संस्थेच्या वतीने आयोजित एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते रक्तदाता कार्ड, रक्तदानाचे प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह प्रदान करून प्रा. डॉ. राजेश नाईक यांना उपकृत करण्यात आले.

## बुद्धगया महाविहार मुक्तीसाठी भव्य चर्चा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

बुद्धांचे धार्मिक ऐतिहासिक स्थळ असलेल्या महाबोधी महाविहार वर 1949 च्या महाबोधी मंदिर कायद्यानुसार बिहार येथील सरकारने त्यावर कब्जा केला ज्यामध्ये बुद्धांचा सहभाग नगण्य आहे. 1990 पासून भारतीय बौद्ध संघटित आंदोलन सातत्याने करूनही त्यांना यश का येत नाही यावर विचार मंथन करण्यासाठी 11 एप्रिल 2025 ला बौद्धगया महाविहार मुक्तीसाठी भव्य चर्चा सत्राचे आयोजन दुपारी एक वाजता टिळक पत्रकार म्हणून येथे करण्यात आले आहे.




अयोध्येचे राम मंदिर आणि बुद्धगया महाविहार नक्की साठी एकाच वेळेस आंदोलन करण्यात आले पण अयोध्याचा प्रश्न निकाली लागला आणि बुद्धगया महाविहार मुक्तीच्या प्रश्नावर बुद्धांना अजूनही न्याय मिळाला नाही. 1949 मध्ये बिहार सरकारने संमत केलेल्या कायद्याने या स्थळाचे नियंत्रण ब्राह्मण पंडित आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती दिले जेव्हा की हे स्थळ पूर्णपणे बौद्ध धर्माशी निगडित आहे. प्रत्येक धर्माच्या पूजा मंदिराचे अधिपथ्य हे त्याच धर्मियांकडे असते.

तेव्हा याचे अधिपथ्य बौद्धांकडे येण्यासाठी 1990 पासून भारतीय बौद्ध नागपूर होऊन संघटित आंदोलन करीत आहे. पण त्यांना यश का येत नाही या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आंदोलनाला नवीन दिशा देण्यासाठी भदंत आनंद महास्थवीर दिल्ली यांच्या प्रमुख उपस्थित होते एका भव्य चर्चासत्राचे आयोजन 11 एप्रिल 2025 ला दुपारी एक वाजता टिळक पत्रकार भवन येथे करण्यात आले आहे.

## महापालिका कर्मचाऱ्यांना शिवीगाळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

श्री जैन सेवा मंडळाचे राकेश गांधी यांनी महापालिका कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केल्याचा गुन्हा कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात महापालिका कर्मचारी राजेश्वर नरखेडकर व मयंक शेंडे यांनी तक्रार केली आहे.

श्री जैन सेवा मंडळाने सुरेश भट सभागृहात कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमादरम्यान राकेश गांधी यांनी क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ केल्याचा आरोप महापालिकेचे टेक्नीशियन राजेश्वर नरखेडकर यांनी केला आहे. खुर्ची न दिल्याच्या कारणावरून राकेश गांधी यांनी शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे. या संस्थेला यापुढे हे सभागृह देऊ नये, असा प्रस्ताव महापालिका आयुक्तांपुढे ठेवण्यात आल्याचे संबंधितांनी म्हटले आहे.

# प्रत्येक महीन्याच्या मंगळवारी पेन्शनर्स लोकांच्या समस्या सोडवा

## मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १० :

पेंशनधारकांचे प्रत्येक महिन्याच्या प्रथम मंगळवारी तालूका स्तरावर प्रत्येक पंचायत समीती मध्ये पेन्शनर्स यांची पेन्शन अदालत घेउन पेन्शनर्स लोकांच्या समस्या सोडविण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी सर्व गटविकास अधिकारी यांना दिले होते.

त्या आदेशानुसार पहिली सभा सर्व पंचायत समिती स्तरावर संपन्न झाली. या अभिनव उपक्रमाला सर्व जिल्हाभर चांगला प्रतिसाद मिळाला. या अगोदर फक्त जिल्हा स्तरावर दर महिन्याच्या दूसऱ्या मंगळवारी पेन्शन अदालत होत होती. आता तिला तालूका स्तरावरची जोड मिळाल्यामुळे पेन्शनर्स शिक्षकांच्या व इतर कर्मचारी यांच्या समस्या सोडविण्यास मदत होऊ शकणार आहे.



या स्तुत्य उपक्रमा बद्दल महाराष्ट्र राज्य सेवा निवृत्त प्राध्यापक, शिक्षक महासभाचे अध्यक्ष अशोक दगडे, सरचिटणीस दिपक सावळकर, राज्य प्रतिनिधी विनोद राऊत, कार्याध्यक्ष सरिता किंमतकर, वरिष्ठ पदाधिकारी साहेबराव ठाकरे, शेषराव घुगल, दिपक तिडके, संजय भेंडे, सुनिता दामले, मधूकर फरतोडे, मुरलीधर काळमेघ, जयदेव टाले, सुधाकर भूरके, मालती आगरकर,अनिल नागपूरे, रमेश बिरणवार, जयश्री कावळे, अरुण बेंडे, विजय बेले, मुरलीधर कामडे, सुनिल मोहोड, प्रशांत पवार, संजय वाळके, रामदास काकडे, नरेश गिन्हे, ज्ञानेश्वर वानखेडे, हरिराम चांदुरकर प्रभाकर लांजेवार, बहादूर वानखेडे, बी.एन. लिखार, श्रीराम वाघे,धनाल कोटवाल,भगवान बाविस्कर,पुरुषोतम चरपे जीवन डफरे, नरेंद्र गोळ, शशी पाटील, सुभाष तभाने, वासुदेव भक्ते, नबी शेख, शंकर बेंडे, लक्ष्मण कवडे, रमेश किरपान, विनोद शिरपूरे, दिपक वंजारी , मुरलीधर ठाकरे, अशोक तपासे ,दामोधर झाडे, एकनाथ मांडवे, प्रतिभा जयपूरकर व सर्व तालूका पदाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी विपूल जाधव यांचे अभिनंदन करत आभार व्यक्त केले.तसेच हा उपक्रम नियमित सुरु रहावा अशी सदिच्छा व्यक्त केली.

# रक्तदान हेच श्रेष्ठ दान : डॉ. सचिन चिंचे

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १० :

रक्तदान हेच श्रेष्ठ दान या विधायक संकल्पनेला मूर्त स्वरूप देत चिंचे हॉस्पिटल रक्त साठवणूक केंद्र, काटोल येथे आज डॉ. सचिन चिंचे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणादायी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन रक्त संक्रमण अधिकारी डॉ. शुभांगी चिंचे यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. सचिन चिंचे म्हणाले की, उन्हाळ्यात रक्तसाठा कमी पडण्याची शक्यता असते, त्यामुळे युवकांनी रक्तदानासाठी पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. या वेळी त्यांनी स्वतः रक्तदान करून इतरांना प्रेरणा दिली. त्यांच्या प्रेरणादायी उदाहरणामुळे शहरातील विविध डॉक्टरांसह ४७ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.




रक्तदात्यांमध्ये डॉ.किशोर ढोबळे, डॉ. अनन्या अमोल करांगळे, डॉ. प्राजक्ता बंड यांचा समावेश होता. रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. चिंचे यांचे मित्रपरिवार तसेच हॉस्पिटलचा कर्मचारी वर्ग पुढे सरसावला. राजेंद्र टेकाडे,सतीश कावडकर, चेतन चांभारे (अनुसया मेडिकल), अरुण ठोटे, स्वप्निल लोही, सचिन डोळस, ओंकार हिवसे, सागर शेरकर, तुषार खीलावत यांनी विशेष मेहनत घेतली.

यावेळी रुग्णसेवक मनोज टेकाडे, जयंत कळंबे, नकुल गुजर, रत्नाकर मेश्राम, सारंग तिजारे, मयूर टेंभे, महेश मेहर, शैलेश चौरागडे यासह ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रत्येक रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि विशेष भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. रक्त संकलनाचे कार्य डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी, नागपूरचे जनसंपर्क अधिकारी प्रवीण पाटील आणि तंत्रज्ञ प्रमिला मॅडम यांच्या सहकार्याने पार पडले. डॉ. सचिन चिंचे हे केवळ वैद्यकीय सेवा नव्हे तर समाजप्रबोधनासाठीही सक्रिय असून त्यांचे कार्य वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय आणि प्रेरणादायी ठरते.

# शिक्षिका वैशाली आखाडे तालुकास्तरावर प्रथम

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १० :

बालाजी हायस्कूलच्या बालाजी नगरच्या शिक्षिका वैशाली गणेश आखाडे यांना राज्य सरकारतर्फे आयोजित व्हिडिओ मेकिंग स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम आणि जिल्हा पातळीवर तृतीय क्रमांक प्राप्त झाला. नागपूर येथील सेंट उसुर्ला गर्ल्स हायस्कूलमध्ये जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थाद्वारे वैशाली आखाडे यांचा प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. या बद्दल संस्थेचे अध्यक्ष दिवाकर दळवी, सचिव दामोधर सांगोळे, मुख्याध्यापिका सरीता साखरकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी वैशाली आखाडे यांचे अभिनंदन केले.



## २० ते २७ एप्रील श्रीगुरूदेव सुसंस्कार शिबिर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तरूणांचे शिबिरं आयोजित करून मानवी जीवनाचे संस्कारी धडे देण्याचा प्रयत्न करायचे. तोच आदर्श डोळ्यासमोर ठेऊन कर्मश्री दुर्गादास रक्षक स्मृति प्रतिष्ठान द्वारा श्रीगुरूदेव सुसंस्कार शिबिराचे आयोजन २० एप्रील ते २७ एप्रीलया दरम्यान करण्यात आलेले आहे.

नागपूरपासून १५ कि. अंतरावर असलेल्या श्रीगुरूदेव मानव मंदिर रक्षक बाग येरला (फेटरी) येथे हे शिबिर घेण्यात येणार आहे.

२०१८पासून सातत्याने या शिबिराचे आयोजन केल्या जाते.

१०वर्षावरील विद्यार्थ्यांसोबत शाळाबाह्य मुलांना या शिबिरात सहभागी होता येईल.

सामुदायिक ध्यान-प्रार्थना, योगासन-प्राणायाम, व्यक्तीमत्व विकास, स्वालंबन, संगीताचे प्राथमिक धडे,आत्मसंरक्षणासाठी लाठी-काठी याचे प्रशिक्षण, मानवतेचे जागरण, राष्ट्रीय एकात्मतेचे धडे या शिबिरातून देण्यात येईल. पालकांनी आपल्या पाल्यांचा सहभाग नोंदवावा असे आव्हान मुख्य संयोजक ज्ञानेश्वर रक्षक यांनी केले आहे.

# जेष्ठ महीलांची महाराष्ट्र दर्शन सहल



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १० :

येथील टेकडीवाडी गौतम नगर मधील वार्ड क्रमांक तीन मधील ज्येष्ठ महिलांना ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान मार्फत आमदार समीर मेघे यांच्या सहकार्याने महाराष्ट्र दर्शन सहल घडवून आणली. कार्यक्रमाचे आयोजन भाजपा वाडी मंडळ अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष योगेश शेंडे यांनी केले.

यावेळी पुरूषोत्तम रागीट,भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष आंनदबाबू कदम व परिसरातील नागरीक उपस्थित होते.

## ओ.पी. नय्यर व रवि ह्यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

सुप्रसिद्ध संगीतकार ओ.पी. नय्यर व रवि ह्यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांनीच संगीतबद्ध केलेल्या हिंदी चित्रपटातील गाजलेल्या गीतांचा कार्यक्रम ऊत्कर्ष हॉल मोरभवन, सीताबर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. म्युझिक माय पॅशन ह्या गीत समुहातर्फे हि संगीतमय भेट देण्यात येणार आहे.

यातील गायक कलाकार आहेत, जयंत वरणकर, सुनिल दहिकर, विद्याधर बक्षी,विजय कालवे, गिरीष वझलवार, दिलीप ढवळे, प्रशांत देवतारे, दिनेश मातुरकर, अजय देशपांडे, अलका लंगडे, गौरी बावडेकर, वैषाली सोनवणे. निवेदन छाया लुतडे ह्यांचे आहे.

# जमाते हिंदचा ईद मिलन समारोह




■ महासागर प्रतिनिधी, कामठी दि. १० :

जमात - ए -इस्लामी हिंद कामठी शाखेच्या वतीने १२ एप्रिल २०२५ ला सायंकाळी ७वाजे पासुन रात्री १० वाजे पर्यंत मोहम्मद अली जौहर मंच, रुईगंज मैदानात होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

वरील कार्यक्रम प्रोफेसर वाजीद अली (इस्लामीक स्कॉलर, नाशिक यांचे अध्यक्षते खाली होणार आहे श्रीमंत राजे मुधोजी राजे भोसले, डॉ.भुषण कुमार उपाध्याय माजी महासंचालक, पूर्व पोलिस आयुक्त नागपुर, डॉ. युगल रायलु माजी प्रोफेसर धरमपेठ नागपुर, डॉ.अखिल बेनी प्रसाद यादव इस्लामीक स्कॉलर कामठी, प्रेमलता दीदी संचालिका कामठी विभाग, मौलाना सिराजूद्दिन, डॉ. राष्ट्रपाल मेश्राम डॉ. मनिषा ठाकरे नागपुर हे या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणुन मार्गदर्शन करणार आहेत.

प्रा.डॉ. अन्वर सिद्दीकी, प्रा. ज्ञानी हरप्रीत सिंह साहेब, भदंत नागदिपंकर महास्थविर, रेव्ह मनीष मधु मटके, राजु मदनकर, युगचंद छल्लाणी विशेष अतिथी असतील.

गणेश जगदाळे तहसीलदार साहेब कामठी, नरेंद्र प्रसाद शर्मा, संदीप बोरकर मुख्याधिकारी नगर परिषद कामठी, प्रशांत जुमडे पोलिस निरीक्षक, प्रणय नितीन पतंगे इत्यादी मान्यवर उपस्थीत राहणार असल्याचे सांगीतले.

# गोसेवा समिती व पंचशील महिला मंडळाद्वारे समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :

गोरक्षण सभागृहाचे गोपाल कृष्ण मंदिर प्राचीन व अत्यंत प्रसिद्ध मंदिर आहे गुढीपाडवा ते रामनवमीपर्यंत गोसेवा समिती व पंचशील महिला मंडळाद्वारे अनेक समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले होते. रामचरितमानस पाठ राम रक्षा स्तोत्र रामायण कालीन स्त्रीपात्र नाट्य प्रयोग ज्याची संहिता मंदिर विश्वस्त ममता चिंचवडकर यांनी लिहिली होती . विविध आयोजनात महानगरातील नामवंत कलाकारांची सेवा अर्पित झालेली होती.

जगदीश दळवी व चमू यांनी भजन संध्या प्रस्तुत केली. राधा चौबे यांनी रामायणकालीन अध्यात्म धर्म व आज या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले. चेताली खटी यांनी राम व शिवाजी महाराज या व्यक्तिरेखांवर सुंदर प्रकारे एकपात्री प्रयोग सादर केला. डॉ रुचा देव व रामदास कवीश्वर यांनी संस्कृत रामायण सादर केले.

## हावरापेठ हनुमान मंदिर रोषणाईने सजले

**नागपूर :** हनुमान जन्मोत्सवासाठी हावरापेठ येथील गणपती हनुमान मंदिराची रंगरंगोटी,तोरणे पताकांनी व विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे. १२ एप्रिलला पहाटे मंगल वाद्ये भूपाळीने कायार्ची सुरुवात होईल.पंचामृताने हनुमंताच्या मुर्तीचे अभिषेक व पूजन करण्यात येईल.पहाटे ५ वा.भजन,सकाळी ६ हनुमान जन्मोत्सव जन्म सोहळ्यावरील अभंग भजन गायन आरती प्रसाद वितरण.दुपारी १२ ते ३ या वेळात होणार आहे. हावरापेठ महिला मंडळाचे भजन,दुपारी ४ ते ६ गोपालकाला कण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध महिला किर्तनकार. सुचीता उपगडे यांच्या किर्तन झाल्यानंतर महाआरती व गोपालकाला प्रसाद वितरण असून रात्री ७ ते १० महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांनी हनुमान जन्मोत्सव सोहळात उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

# १४ वी अखिल भारतीय रेल्वे संरक्षण दल, बँड स्पर्धा-२०२५



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :

१४ व्या अखिल भारतीय, रेल्वे संरक्षण दल, बँड स्पर्धा-२०२५ चे उद्घाटन ०९.०४.२०२५ रोजी रेल्वे एन.ई. येथे होणार आहे. हे बिलासपूर येथील इन्स्टिट्यूट ग्राउंड येथे आयोजित करण्यात आले होते, ज्याचे उद्घाटन प्रमुख पाहुणे मुनव्वर खुर्शीद, महानिरीक्षक-सह-प्रधान मुख्य सुरक्षा आयुक्त, रेल्वे संरक्षण दल, आग्नेय पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूर यांनी केले.

बिलासपूरमध्ये सलग तिसऱ्यांदा हा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. या स्पर्धेत, रेल्वे संरक्षण दल आणि विविध रेल्वेच्या रेल्वे संरक्षण विशेष दलाच्या १५ संघांमधील २३८ सहभागी दल सदस्य सहभागी होत आहेत. या उद्घाटन समारंभात, प्रमुख पाहुण्यांनी सर्व सहभागींना त्यांचे सर्वोत्तम प्रदर्शन करण्यास प्रेरित केले, ज्यामुळे जयपूर येथे होणाऱ्या २६ व्या अखिल भारतीय पोलिस बँड स्पर्धा-२०२५ मध्ये सहभागी होणारा एक उत्कृष्ट संघ तयार होण्यास मदत होईल. आरपीएफचे उपमहानिरीक्षक-सह-मुख्य सुरक्षा आयुक्त मोहम्मद साकिब, बिलासपूरचे आरपीएफचे वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त दिनेश सिंग तोमर उपस्थित होते.

# रेल्वे स्थानकावर मिस्ट कुलिंग सिस्टीम सुरू

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :

मध्यवर्ती रेल्वे स्थानकावर प्रवाशांना उकाड्यापासून दिलासा देण्यासाठी रेल्वेने आता मिस्ट कुलिंग सिस्टिम सुरू केली आहे. ही यंत्रणा सुरु झाल्याने प्रवाशांनी दिलासा व्यक्त केला नागपूरचा कडक उन्हाळा प्रवाशांचा घाम काढणारा आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवडयात ४२ अंश सेल्सिअस तापमानात प्लॅटफॉर्म परिसरात उभे राहणे कठीण जाते. तर मे महिन्यात पारा ४५ अंशाच्यावर नेहमीच जातो. अशा स्थितीत भर उन्हात रेल्वेगाड्यांची वाट पाहणे प्रवाशांना त्रासदायक ठरते.हीच बाब लक्षात घेवून रेल्वने प्लॅटफॉर्मवर थंडगार वातावरण निर्माण व्हावे म्हणून मिस्ट सिस्टिम लावली आहे.



उष्णतेचे चटके बसू नयेत म्हणून मिस्ट कुलिंग सिस्टिमकाही प्रमाणात थंड वातावरण तयार करते. रेल्वेचे लोखंडी शेड दिवसभर तापल्याने उन्हाळ्यात फलाट परिसरात झळा सहण कराव्या लागतात. मध्य रेल्वे प्रशासनाने सुरू केलेली ही यंत्रणा प्रवाशांना दिलासा देणारी आहे. स्थानकावर गाड्या येण्याच्या काही वेळा आधी ही सिस्टीम सुरू होते. प्लॅटफॉर्मच्या छतावर छोटा पाइप बसविण्यात आला आहे. त्यातून पाण्याचा फवारा (स्प्रे) बाहेर निघतो. रेल्वे गाडीवर आणि प्लॅटफॉर्मवर फवाऱ्याचे पाणी पडत असल्याने तापमान त्वरित ७ ते ८ अंशाच्या खाली येते. त्यामुळे गारवा निर्माण होऊन उकाड्यापासून दिलासा मिळतो. तसेच परिसरात तापमान नियंत्रित राहण्यास मदत मिळते. उन्हामुळे रेल्वेगाडीचे तापलेले छत थंड होते.

त्यामुळे गाडीतून उतरताना किंवा चढताना उष्णतेच्या वातावरणापासून दिलासा मिळतो.

# सामाजिक समता सप्ताहाचे उद्घाटन संपन्न




■ महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. १० :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी)पुणे व दिशा व दृष्टी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, रामटेक यांच्या वतीने रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक येथील सभागृहात सामाजिक समता सप्ताहाचे उद्घाटन विभाग प्रमुख चेतना उके यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेने व महाराष्ट्र गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित हटवार यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून तालुका रामटेकचे समतादूत राजेश राठोड, तालुका मौद्याचे समतादूत ओमप्रकाश डोले व दुर्योधन बगमारे उपस्थित होते. विभाग प्रमुखांच्या हस्ते रितसर फीत कापून सामाजिक समता सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. या सप्ताहामध्ये वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, विविध विषयावरील प्रबोधने व प्रश्नमंजुषा यांचा समावेश करण्यात आला असल्याचे समतादूत राजेश राठोड यांनी सांगितले आहे.

आभार निकिता अंबादे यांनी केले. सदर कार्यक्रमाला मयुरी टेंभुर्णे, विलास मडावी, आकाश मोहबिया, देवानंद नागदेवे, जयेंद्र वासनिक, राजेश मोहनकर, राजश्री माहुले व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## सरस्वती नगरात श्री हनुमान जयंती शनिवारी

**नागपूर :** मानेवाडा रिंग रोडवरील दक्षिण नागपूरातील सरस्वतीनगर बहुउद्देशीय सेवा संस्था सरस्वती नगर च्या सौजन्याने चैत्र पौर्णिमा उत्सवाला, श्री हनुमान जयंती साजरी करण्यात येत असल्याची माहिती संचालक मंडळांनी दिली. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा 12 एप्रिल रोजी, करण्याचे ठरविले आहे. शनिवारी सकाळीच ६ वाजता. श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा कार्यक्रम व सायंकाळी आरती झाल्यानंतर लगेच ७ ते १० या दरम्यान महाप्रसादाचे आयोजन केले असून भक्तांनी लाभ घ्यावा. तरी सरस्वती नगर बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या कार्यकारीमंडळा तर्फे नगरातील नागरिकांनी आणि महिलांच्या सहकार्याने या सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. संचालक मंडळ व सल्लागार समिती अथक परिश्रम घेत आहे.

# एन.एम.एम.एस. परीक्षेत राजेंद्र हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुयश

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील प्रतिभावान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे वर्ग आठवीतील विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय साधन-सह-गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षेत महाल परिसरातील राजेंद्र हायस्कूल ज्युनियर कॉलेज येथील पाच विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत यादीत स्थान पटकावले आहे.



उत्कर्ष निलेश कोसरकर, चित्रांश नितीन महाजन, श्रावणी प्रमोद लांजेवार, सुधांशू आनंद मोहपेकर, विशेष अमित चावडा या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश प्राप्त करत शाळेच्या नावलौकिकात भर घातलेली आहे. त्यातही उत्कर्ष कोसरकर हा विद्यार्थी नागपूर जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत तर चित्रांश महाजन हा पाचव्या स्थानावर आहे. प्रतिभावान विद्यार्थ्यांना शाळा म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री राजेंद्र हायस्कूल येथील कुशल शिक्षकांद्वारे मुख्याध्यापिका डॉ. स्मिता नाहातकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष वर्ग चालवून स्पर्धा परीक्षांकरिता विद्यार्थ्यांची तयारी करवून घेतली जाते.

दि. एम. पी. एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रमेश ठोंबरे, उपाध्यक्षा मंगला नखाते, मोहन नाहातकर, सहसचिव विवेक नाहातकर, सदस्या रश्मी ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापिका डॉ. स्मिता नाहातकर, डॉ. अर्चना बोडखे, पर्यवेक्षिका वर्षा निवांत, पर्यवेक्षक विलास जाधव, शाळेतील शिक्षक वर्ग व पालकांना दिले आहे.

# थोर महापुरुषांच्या जीवनांवर सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १० :
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त दर वर्षी प्रमाणे प्रबुद्ध सांस्कृतिक संघ व वाचनालय न्यु खलाशी लाईन कामठीच्या वतीने न्यु खलाशी लाईन स्थित, अविनाश हायस्कुल येथे परमपुज्य डॉ. बाबासाहेब भिमराव आंबेडकर व इतर काही थोर महापुरूषांच्या जिवनपटावर एक दिवसीय सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षा आयोजित करण्यात आले होते.

या परिक्षेत ८ ते त्यापेक्षा जास्त वयांच्या स्पर्धकानी परिक्षेत सहभाग घेतला. स्पर्धा परिक्षेला कामठी शहर व ग्रामीण परिसरातील अंदाजे २६० ते १८० विद्यार्थी सहभागी झाले होते. परिक्षा सुरळीत पार पडली असून परिक्षेचा निकाल १३ एप्रिलला जाहिर करण्यात येईल व त्याच दिवशी सायंकाळी ६वाजता बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होईल. परिक्षेच्याय यशस्वी आयोजनासाठी ॲड. डि.सी. चहांदे, अजय कदम जी, दिपंकर गणवीर, सदानंद मेश्राम सर, मिलिंद चवरे, अरविंद मेश्राम, अतिश देशभ्रतार, अनुभव पाटील, आशिष गेडाम, रोहित थुले ,शुंभम रंगारी, भुषण मेश्राम, रॉबी राऊत, सुधिर डोंगरे, समीर चवरे, संदीप कांबळे, विवेक पाटील, रोशन देशभ्रतार, प्रविण लांजेवार, मोहित लोणारे, विशु राऊत, विशाल रंगारी, रोहित रंगारी, सिद्धांत गेडाम, करण बेलेकर, अक्षय गेडाम, अभिजित मेश्राम, अभिजित रोडगे, मयुर कांबळे, श्रेयश थुले, आयुष मोटघरे, हनी थुले, हिमांशु रामटेके, यश पाटील, यश खोब्रागडे, पियूष खोब्रागडे, आर्यण लोणारे, जित रंगारी, मृदुल वाहने, बिट्टू राऊत,मंथन मेश्राम, श्रावण शेंडे, आहान सुर्यवशी, पिंटु कांबळे, विनय घरडे, प्रिती लांजेवार, आदींनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

# शेतकरी संघटना स्थापन करणाऱ्या महानविभूतीचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. १० :
नरखेड तालुका शेतकरी संघटनाच्या वतीने दि.९ एप्रिल रोज बुधवार रोजी सकाळी १२ वाजता महात्मा फुले सांस्कृतिक सभागृह स्वामी विवेकानंद चौक नरखेड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण बांदरे माजी उपाध्यक्ष मार्गदर्शक शेतकरी संघटना नागपूर, वामनराव चटप माजी आमदार महाराष्ट्र राज्य, स्वागताध्यक्ष श्री वसंतराव वैद्य अध्यक्ष शेतकरी संघटना नरखेड, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.



या कार्यक्रमात मदन दाजीबाजी कामडे विदर्भ प्रमुख शेतकरी संघटना व भाऊरावजी नासरे माजी सभापती पं. स. नरखेड या महानविभूतीचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला. ही एक अभिमानाची व गौरवास्पद महान क्रांतिच मनावी लागेल या दोन महाविभुतीनी शेतकरी संघटनेचा पाया रचला त्यांच्या या महान क्रांतीने आज शेतकरी संघटना पाहवयास व त्यांची कार्य दिसत आहे.

त्यांच्या या महानिभूतीची दखल घेत त्यांचा आज शेतकरी संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सौ शैलेजाताई देशपांडे माजी अध्यक्ष महिला आघाडी, सतीश दाणी, अण्णाभाऊ केदार, मुकेश मासुरकर, श्रीमती रंजनाताई मामडे, प्रकाशभाऊ चरडे माजी नगरसेवक न. प. नरखेड, हे उपस्थित होते. शेतकरी संघटनेच्या सदस्यांनी व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या समस्या विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजक नारायण बांदरे, रामचंद्र बहुरूपी, पत्रकार राजेंद्र बागडे, व समस्त सर्व शेतकरी संघटना नरखेड तालुका व गावकरी बांधव युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री टेकडी रोड हनुमान मंदिरात विशेष कार्यक्रमांचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
दरवर्षीप्रमाणे, यावर्षीही श्री टेकडी रोड हनुमान मंदिर समितीतर्फे श्री टेकडी रोड हनुमान मंदिर, गवळीपुरा, सीताबर्डी येथे हनुमान जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. हनुमान जयंती निमित्त सोमवार दिनांक ७ एप्रिल ते १२ एप्रिल दरम्यान विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमांच्या मालिकेत अखंड रामायण पाठ, रुद्राभिषेक, भजने, महानैवेद्य, सुंदरकाण्ड पठण अगदी भक्तिमय वातावरणात पार पडले. आज दिनांक १० एप्रिल रोजी दुपारी २ वाजता थाडेश्वरी राम मंदिर महिला मंडळातर्फे भजन आणि सायं. ७ वाजता जस गायक संदीप करोसिया आणि श्याम भजन मंडळ यांचे जागरण सादर केले जाणार आहे. ११ एप्रिल रोजी भजन संध्या आणि हनुमान जयंती अर्थात शनिवार दिनांक १२ एप्रिल रोजी सकाळी ५:१५ वाजता महाअभिषेक व सकाळी ११:१५ वाजता महाआरतीनंतर सर्व भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमांचा आणि महाप्रसादाचा आस्वाद घ्यावा.

# शांती अहिंसेचा संदेश देत निघाली प्रभातफेरी

## भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ महावीरनगर नागपूर द्वारे जैन धमार्चे 24 वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या 2624 व्या जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त महावीरनगरातील श्री महावीर दिगंबर जैन मंदिर येथून गुरुवारी सकाळी प्रभातफेरी काढण्यात आली. रथात पालखीत भगवान महावीरांची प्रतिमा ठेवण्यात आली होती. महिला, पुरुष, बच्चे कंपनी प्रभातफेरीत सहभागी झाले होते.

अहिंसा, शांतीचा संदेश देत प्रभातफेरी मंदिराचे अध्यक्ष चंद्रकांत वेखंडे, कार्यवाह प्रकाश मारवडकर यांच्या मार्गदर्शनात गणेशनगर, ग्रेट नाग रोड, मयुर मंगल कार्यालय, महावीरनगर परिसर मार्गे मंदिरात पोहोचली. मार्गात भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री नितीन नखाते यांनी केले. प्रभातफेरीचे संयोजन मनोज बंड यांनी केले. मंदिरात भगवान महावीरांचा जन्माभिषेक संपन्न झाला. शांतीमंत्र अभिषेक संतोष पांजरेकर, एकशे आठ कळस प्रथम अभिषेक सुनील नखाते, प्रफुल्ल मारवडकर, वीरेंद्र फुलाडी, जिनेंद्र जैन यांनी अभिषेक केला.



अखिल भारतीय पुलक मंच परिवार महावीर वार्ड नागपूर द्वारे भगवान महावीर व त्यांची अहिंसा या विषयावर चित्ररथ, अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्था पूर्व नागपूर द्वारे पाळण्यात बाळ महावीर असा चित्ररथ काढण्यात आला.

प्रभातफेरीच्या मार्ग रांगोळी व फुलांनी सुशोभित केला होता. तीर्थंकर भगवान महावीरांच्या प्रतिमेचे नागरिकांनी पूजन करून स्वागत केले. शीतपेय, प्रसाद, ताक, आईसक्रीमचे वितरण पुलक मंच परिवार महावीर वार्ड नागपूर, श्री दिगंबर जैन युवक मंडळ (सैतवाळ), किशोर धोपाडे परिवार, प्रदीप शिवणकर परिवार परिवाराद्वारे करण्यात आले. जैन बांधवांमध्ये भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह होता.

प्रभातफेरी यशस्वी करण्यासाठी सुभाष मचाले, दिलीप राखे, प्रशांत सवाने, श्रीकांत मानेकर, विशाल चाणेकर, भरतेश नखाते, अमोल भुसारी, पराग पोहरे, नीरज पळसापूरे, राजेश गडेकर, सुधीर सिनगारे, नरेश मचाले, राजेश जैन, प्रशांत भुसारी, अविनाश शहाकार, श्रीकांत तुपकर, उमेश फुलंबरकर, सचिन नखाते, मनोज मानेकर, दिलीप सावळकर, राजेंद्र सोनटक्के, डॉ. नरेंद्र भुसारी, राजेंद्र नखाते, मनुकांत गडेकर, रितेश जैन, युगल पोहरे, संयम भुसारी, नीलेश विटाळकर, अतुल महात्मे, सौरभ गुलालकरी, योगिता गडेकर, प्राची पोहरे, प्रणिता मानेकर, नलिनी मारवडकर आदींनी परिश्रम केले. भगवान जन्म कल्याणक महोत्सवाच्या शोभायात्रेच्या मार्गात पुलक मंच परिवार शाखा महाल नागपूरच्या सदस्यांनी पुष्पवृष्टी केली. अध्यक्ष राजेंद्र सोनटक्के, महामंत्री मनोज मांडवगडे, जैनेंद्र जैन यांच्या नेतृत्वात जितेंद्र गडेकर,संजय आगरकर, मनोज बंड, दिलीप सावळकर, प्रशांत कहाते, निशिकांत काटोलकर, अनंतराव गव्हाणे, रश्मी सोनटक्के, सविता मांडवगडे, जया गडेकर, अर्चना कहाते, राधा काटोलकर, ममता गव्हाणे यांनी केली.

# श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. १० :
रामनवमी निमित्य काढण्यात आलेल्या शोभायात्रेस गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शोभायात्रेतील चित्ररथ स्पर्धेत उमंग डांगरे या विद्यार्थिनीची 'अशोक वाटिका' चित्रकृती प्रथम आली. ५ हजार रुपये रोख बक्षीस देऊन तिला गौरविण्यात आले. राहुल गाते यांची मातीची ' श्रीराम मूर्ती ' द्वितीय ठरली. त्यास ३ हजार रुपयाचा पुरस्कार मिळाला.


तर रामचंद्रबाबा देवस्थानच्या वतीने सादर झालेल्या वनवासी राम लक्ष्मण सीता या देखाव्यास २ हजाराचे तृतीय बक्षीस मिळाले. याशिवाय वेदांत दांडेकर यांच्या अयोध्येच्या देखाव्यास प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. यावेळी राजेश लोहकरे, पुष्कर डांगरे, कैलास साठवणे राजेंद्र चिपडा, केशव भगत, प्रमोद गवळी व अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्य रस्त्यावर तोरण पताका, रांगोळी, विद्युत रोषणाई करण्यात आली होती. डीजेमुळे युवकांमध्ये राम भक्तीचा जोश निर्माण झाला होता. यात्रेला शोभा आल्यामुळे शोभायात्रेत उत्साह निर्माण झाला होता. श्रीराम मंदिरा पासून भोयर मंगल कार्यालय मार्गे बुद्ध विहार, झाडे चौक, गुजरी चौकातून बाजार चौक, बसस्थानक अशी शोभायात्रा फिरली.

बसस्थानकावर बक्षीस वितरण करून सांगता झाली. यशस्वीतेसाठी महेंद्र तेलरांध्ये, आकाश साठवणे, अभिनव गोळघाटे, पंकज रोडे, महादेव बरवड, सौरभ महल्ले, प्रशांत नागोसे, नितीन चाकोले, मनोज माहुरकर, दर्शन तरारे, भावेश सातपुते, उमेश बडवाईक, मनीष बारापत्रे, भूषण घुमडे, देवकुमार जेवळे आदींनी परिश्रम घेतले. कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम बेला पोलिसांनी केले.

## बसपाद्वारे महात्मा फुले जयंती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :



सामाजिक क्रांतीचे जनक, शुद्रांची सर्वप्रथम ओळख करून देणारे, भारतीय अस्पृश्यांसाठी व महिलांसाठी सर्वप्रथम शाळा सुरू करणारे, ब्राह्मणांचे कसब, शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी सार्वजनिक सत्यधर्म आदि पुस्तकांचे लेखक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक, महात्मा ज्योतिराव फुले यांची 11 एप्रिल रोजी 198 वी जयंती आहे.

कही हम भूल ना जाये या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत शुक्रवार दिनांक 11 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता महात्मा फुले मार्केट परिसरातील महात्म्यांच्या पुतळ्याला माल्यार्पन करून अभिवादन करण्यात येईल. बसपाच्या प्रदेश, जिल्हा, शहर, विधानसभा, सेक्टर व बूथ स्तरावरील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते हितचिंतकांनी तसेच फुले शाहू आंबेडकर कांशीराम जी ह्यांच्या विचाराच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले आहे.

# लाव्हयात आरोग्य शिबीराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :
लाव्हा ग्रामपंचायत व शालिनीताई मेघे हॉस्पिटल, वानाडोंगरी यांच्या संयुक्त सहकार्याने राष्ट्रीय अनुसूचित जाती-जनजाती विकास परिषद, नवी दिल्ली अंतर्गत लाव्हा ग्रामपंचायतच्या प्रांगणात आरोग्य तपासणी शिबीर गुरुवार १० एप्रिल रोजी पार पडले. यावेळी शेकडो रुग्णाची तपासणी करण्यात आली.

उद्घाटन सरपंच ज्योत्सना सुजित नितनवरे यांच्या हस्ते राष्ट्रीय अनुसूचित जाती-जनजाती विकास परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवी सोमकुवर, माजी जिल्हा परिषद सदस्य सुजित नितनवरे, परिषदेचे नागपूर जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर देशभ्रतार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शिबीरातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवांसह मोफत औषधांचा लाभ ग्रामस्थांना मिळाला.



ग्रामीण भागातील नागरीकांसाठी आरोग्य शिबीर वरदान ठरल्याचे सरपंच ज्योत्सना नितनवरे यांनी सांगितले. स्त्रीरोग विभागात डॉ. स्नेहल भगत, डॉ. पार्थिव पटेल, नेत्र विभागात डॉ. भूमिका अदभूते, डॉ. वंशिका राठोड, दंत विभागात डॉ. दिशा खोब्रागडे, डॉ. दीक्षा सरोदे, डॉ. निकिता पांगु, मेडिसिन विभागात डॉ. दीपक घुटे, डॉ. गौरव जयस्वाल, डॉ. गौरी बाहेकर, सर्जरी विभागात डॉ. सुरेश काकड, डॉ. साहिल सिंग, डॉ. रिहा जोशी यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

औषध वितरणात दिव्या खैरे, सुनील उमाळे, भोजराज , चेतना दाते यांनी सहकार्य केले. आयोजनासाठी डॉ. अश्विनी मेश्राम, डॉ. ऋषिकेश मेश्राम यांनी सहकार्य केले.

# व्हीएनआयटीच्या विद्यार्थ्यांनी बनवला चार्जर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
इलेक्ट्रिक वाहनाला तीन तासात चार्ज करणारा वायरलेस चार्जर व्हीएनआयटीच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे डॉ. रितेश केशरी व त्यांच्या पीएच.डी. तसेच एम.टेक. विद्यार्थ्यांच्या चमूने तयार केला आहे. हा वायरलेस चार्जर व्हीएनआयटीच्या सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड मोबिलिटीच्या ई-मोबिलिटी लॅबमध्ये काम करतो. तो 4.8 किलोवॅट क्षमतेच्या हलक्या इलेक्ट्रिक वाहनाला तीन तासात चार्ज करतो आणि त्याची ग्रिड पॉइंट टू बॅटरीची कार्यक्षमता 92 टक्के आहे. हा वायरलेस चार्जर 17.5 सेमीपर्यंत पॉवर ट्रान्सफर करण्यास आणि 50 टक्के मिस अलाइनमेंट करण्यास सक्षम आहे.

वायरलेस चार्जिंग हा इलेक्ट्रिक वाहन चार्ज करण्यासाठी लवचिकतेसह एक उपाय आहे जिथे आपल्याला चार्जिंग पॉइंट आणि वाहनामध्ये वायर्ड कनेक्शनची आवश्यकता नाही. वायरलेस चार्जिंग दोन प्रकारचे असू शकते. एक स्थिर चार्जिंग जिथे वाहन स्थिर/उभे राहते व दुसरे गतिमान असताना चार्जिंग जिथे वाहन चालत राहते व चार्ज होते. एका सामान्य वायरलेस सिस्टममध्ये ग्रिड पॉइंट (सिंगल/थ्री फेज) मधून ऊर्जा प्राप्त करण्यासाठी पॉवर इलेक्ट्रॉनिक्स सिस्टम, उच्च-फ्रिक्वेन्सी इंडक्टिव्ह कपलिंगद्वारे ग्रिड पॉइंटमधून वाहनात ऊर्जा हस्तांतरित करण्यासाठी कॉइल सिस्टम व ऑन-बोर्ड बॅटरी चार्ज करण्यासाठी ऑन-बोर्ड पॉवर इलेक्ट्रॉनिक्स असतात. वायरलेस चार्जरमध्ये एक कॉईल जमिनीत पुरली जाते व दुसरी कॉईल वाहनाच्या तळाशी स्थिर केली जाते. जेव्हा दोन्ही कॉईल जवळ येतात तेव्हा वाहनाचे चार्जिंग सुरू होते. सामंजस्य करार राष्ट्रीय पॉवर इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान मोहिमेच्या फेज-तीनच्या राष्ट्रीय सुकाणू समितीच्या 7 एप्रिल रोजी बैठकीत, व्हीएनआयटीने गोबल बिझनेस सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या संरक्षण क्षेत्रातील कंपनीसोबत करारावर स्वाक्षरी केली, जी पूर्वी कनेक्ट ब्लू टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखली जात होती. व्हीएनआयटी, सीडॅक व गोबल बिझनेस सोल्युशन्स यांच्यात त्रिपक्षीय करार झाला आहे.श्ठक्ळ हा करार व्हीएनआयटीत विकसित केलेल्या स्वदेशी वायरलेस चार्जरच्या व्यावसायिकीकरणासाठी सीडॅक - तिरुवनंतपुरम व इंडस्ट्री टेक्निकल सपोर्ट पार्टनर्स, बोस रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड, बंगळुरू व हाय राइज ट्रान्सफॉर्मर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आला. या कराराला भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व तंत्रज्ञान मंत्रालयाचे आर्थिक पाठबळ मिळाले आहे.

# गायक-कलावंतांनी प्रभावीपणे साकारला अभंगराम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
सरगम संगीत अकादमी व राममंदिर, अयोध्यानगर यांनी रामनवमीनिमित्त आयोजित केलेल्या अभंगराम या कार्यक्रमात अकादमीच्या ५० विद्याथ्यारनी आपल्या स्वरसाधनेचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत निवडक गीत रामायण व संतांच्या अभंगवाणीने उपस्थित रसिकांना भिजविले. संतांची अभंगवाणी व गदिमांचे अजरामर गीतरामायण यावर महाराष्ट्र भावसंगीत परंपरेचे व आपल्या संतसंस्कृतीचे दर्शन घडविणारी एक भिममय व राममय अशी संध्याकाळ अभंगरामच्या निमित्ताने अकादमीच्या कलावंतांनी साकारली. अभंगराम कार्यक्रमाची रचना पाच भागात करण्यात आली होती.

पहिल्या भागात जय जय राम कृष्ण हरी या नामगजराने सुरुवात करून, रूप पाहता लोचनी, सुंदर ते ध्यान हे अभंग घेऊन जय जय विठ्ठल रखुमाईच्या गजराने पहिल्या भागाचा शेवट करण्यात झाला. दुसऱ्या भागात संतांच्या अभंगवाणीतील भूपाळी, काकडा या प्रकारांचे गतिमान व सलग सादरीकरण करण्यात आले. तिसरा भाग हा संपूर्णपणे गीतरामायणातील गीतांनी व इतर रामगीतांनी सजलेला होता. त्यामध्ये मंगल भवन अमंगल हारी, कुश- लव रामायण गाती, दशरथा हे पायसदान, ह्राम जन्मला व सखी, सावळा ग रामचंद्र, ज्येष्ठ तुझा पुत्र मला, स्वयंवर झाले सीतेचे, आनंद सांगू किती, थांब सुमंता थांबवी रे रथ, नाम घेता मुखी राघवाचे, भूवरी रावणवध झाला, ही गाणी समूहगीताच्या पद्धतीने व सलगपणे सादर करण्यात आली. आशीष गायधन, तबल्यावर अनिरुद्ध सुरतेकर, टाळकरी हार्दिक राऊत व अथर्व गाडबैल यांनी वाद्यांची साथसंगत केली. तिसऱ्या भागात अकादमीचे सूत्रधार भरत नरुले व अकादमीचे प्रमुख गायक रश्मी रायटर, तेजस्विनी कोमलकर, अंजली वानखेडे, बादल बोंडे, अरुणा कडू, मनीषा जैन, मेघा निचंते, शैलजा राऊत या कलावंतांनी स्वतंत्रपणे पंढरीचा राजा उभा भेकाजा, बोलावा विठ्ठल, रंगा येई वो, पांडुरंग नामी, वेढा वेढा रे पंढरी, खेळ मांडियेला, धरिला पंढरीचा चोर या विविध अभंगांचे प्रभावी सादरीकरण केले. अखेरच्या पाचव्या भागात संतांच्या गौळणी सादर करण्यात आल्या. या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना व संगीत संयोजन सरगम संगीत अकादमीचे संचालक भरत नरुले यांचे होते. कार्यक्रमाचे निवेदन डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी केले. की-बोर्डवर सौरभ किल्लेदार, मृदंगावर, आशीष गायधन, तबल्यावर अनिरुद्ध सुरतेकर, टाळकरी हार्दिक राऊत व अथर्व गाडबैल यांनी वाद्यांची साथसंगत केली.

## धंतोली उद्यानाला मिळणार मल्लखांब

**नागपूर** : धंतोली उद्यान पारंपरिक भारतीय खेळासाठी एक नवीन केंद्र बनणार आहे. धंतोलीचे रहिवासी आणि या खेळाचे निष्ठावान चाहते शिरीष चक्रदेव यांचा उद्देश, नागपूरच्या तरुणांमध्ये या प्राचीन आणि शारीरिकदृष्ट्या मागणी असलेल्या खेळाला प्रोत्साहन देणे हा आहे. त्यांचा असा विश्वास आहे की युवा पिढीला मल्लखांबाची ओळख करून दिल्याने केवळ या समृद्ध सांस्कृतिक वारसाचे जतन होणार नाही, तर त्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती आणि शिस्तीतही भर पडेल. या समारंभाला विधान परिषद सदस्य संदीप जोशी यांची प्रमुख पाहुणे उपस्थिती लाभणार आहे.

# शिवरायांच्या म्युरलचे लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे म्युरल भीत्तीचित्र व सौंदर्यीकरण महापालिकेच्या माध्यमातून व आ. प्रवीण दटके यांनी दिलेल्या 19 लाख 99 हजार 106 रुपये निधीतून मनीषनगर रेल्वे अंडरपासमध्ये उभारण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण आ. संदीप जोशी यांच्या हस्ते झाले.

भाजपाचे दक्षिण-पश्चिम मंडळ अध्यक्ष रितेश गावंडे, माजी नगरसेवक व सत्तापक्ष नेते अविनाश ठाकरे, माजी नगरसेविका जयश्री वाडीभस्मे, महामंत्री माजी नगरसेवक संदीप गवई, माजी नगरसेविका विशाखा मोहोड, किशोर वानखेडे, रमेश शिंगारे, रुपराव शिंगणे, रमेश भंडारी, संयोजक सचिन कारळकर, संजय सिन्हा, आशीष पाठक, संजय खोरगडे, शशीकांत खरात, प्रफुल घाटे, भूषण केसकर, योगेश किटकरू, शालिनी बुल्ले, अंजली देशपांडे उपस्थित होते. स्मृती मुलमुले व कल्पना बांबले दोघींनी शूर आम्ही सरदार आम्हाला काय कोणाची भीती हे गीत सादर केले. आ. संदीप जोशी यांनी कार्यकर्ते व नागरिकांना सदैव जागरूक राहण्याचे आवाहन करीत विकासाच्या कामासाठी कायम तत्पर राहील व तुमच्या सोबत असेल, असे आश्वासन दिले. त्यांचा नरेंद्रनगर प्रभाग, श्यामनगर शाखा, संभाजी शाखा न्यू मनीषनगरतर्फे तसेच युवा मोर्चाकडून निखिल गौलकर यांच्या चमूने सत्कार केला.

# मागासवर्गीय गोपाळ समाज संस्थेतर्फे सांस्कृतिक गीताचा कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :
माहुरझरी येथील मागासवर्गीय गोपाळ समाज कल्याणकारी संस्था एफ न.९७१७,साई सर्वांगीण समाज विकास संस्था कुही एफ न.१६०३२, अजित बालक मंदिर वाडी एफ नं. ६०२९ यांच्या संयुक्त सहकार्याने तराने नये पुराने गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम बुधवारी २ एप्रिल रोजी विदर्भ हिंदी साहित्य संमेलन नटराज हॉल नागपूरात घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुण कराळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वैशाली तलवेकर, कार्यक्रमाचे आयोजक अशोक लोणारे, माजी जि.प. सदस्य आनंदराव खडसे रामदास मानेराव प्रामुख्याने व्यासपिठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन समीर पठाण यांनी तर आभार रेखा सूर्यवंशी यांनी मानले.



यावेळी गायक अलका गोडाने, अनिता मुन, झोडापे, संगीता नेताम सोनाली रामेलवार, स्मिता, रेखा हजारे नीतू चौरागडे, उज्वला,अनिता खिल्लारे, प्रवीण थेटे गौरव थुल, प्रशांत बहादुरे, अनिल कुकवास नरेश कावळे, सुरेंद्र शर्मा, संजय खांडेकर, विवेक पाध्ये, सुरेश कठाळे, निलेश पाटील समीर पठाण, राजे शिवहरे, शुभम काळे, सुनील कठाळे, रेखा सूर्यवंशी यांनी गीते सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली.


YOU ARE CORDIALLY INVITED!
PLEASE JOIN US IN CELEBRATING FIRST ANNIVERSARY
1st ANNIVERSARY CELEBRATION
57 YEARS OF PURITY & TRUST
BATUKBHAI
JEWELLERS
SINCE 1968
SHANKAR NAGAR
SUPER SAVING
OFFERS & SCHEMES
GOLD AT OLD RATES*
On Selected Jewellery pieces or above a certain purchase value
NO MAKING CHARGES*
On Selected Jewellery pieces or above a certain purchase value
0% MAKING IN DIAMOND*
FREE TRIP ASIA & EUROPE*
HURRY, OFFER ENDS ON APRIL 30
PREMIUM SHOPPING EXPERIENCE (12 & 13 APRIL) BOTH DAYS
Shopping Hours (11 AM - 2 PM)
• Personalized jewellery styling for clients. • Special discounts & customized design for premium buyers
DAY 1 : APRIL 12, 5 PM - 8 PM
DIAMOND & BRIDAL JEWELLERY SHOWCASE
• Exclusive Unveiling of New Diamond Collection
DAY 2 : APRIL 13, 4 PM - 6 PM
FASHION SHOW & SPECIAL ACTIVITY
DAY 2 : APRIL 13, 4 PM - 8 PM
BRIDAL JEWELLERY FEST
• Personalized bridal jewellery consultation with experts
*Conditions apply
New Showroom, 67, Shankar Nagar | Call : +91 77450 77778
Follow us on Instagram
Location Map